|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव - ४२५००१

## NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON- 425001

'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

जा.क्र.उमवि/५/DO.०५/३४५/२०१७ दि.२२/०७/२०१७

प्रति,
**कक्ष अधिकारी,**
प्रवेश व पात्रता विभाग,
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव.

**विषय** :- शै.वर्ष २०१७-२०१८ करिता विद्यार्थी प्रवेश क्षमता वाढवुन देणे बाबत.
**संदर्भ** :- १. विद्यापीठाचे पत्र जा.क्र.उमवि/५/Addl.Intake FY-१७-१८/२८८/२०१७ दि.६.७.२०१७
२. विद्यापीठाचे पत्र जा.क्र.उमवि/५/Addl.Intake FY-TY-१७-१८/२८९/२०१७ दि.६.७.२०१७
३. महाविद्यालयाचे दि.२१.७.२०१७ चे पत्र.

**महोदय,**

उपरोक्त विषयास अनुसरुन प्राप्त झालेल्या आदेशान्वये आपणास कळविण्यात येते कि, शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करिता विद्यार्थी क्षमता वाढवुन मिळण्याबाबत विद्यापीठास प्रस्ताव सादर केलेला होता. त्याअनुषंगाने शै.वर्ष २०१७-१८ करीता विद्यार्थ्यांच्या प्रवेश क्षमतेत खालील प्रमाणे वाढ करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

**शै.वर्ष २०१७-२०१८ करिता प्रवेश क्षमता वाढी बाबतचे विवरण**

| अ.क्र | महाविद्यालयाचे नाव | विद्यार्थी संख्या वाढीचा वर्ग / अभ्यासक्रम | मंजुर असलेली मुळ प्रवेश क्षमता | दिनांक ६.७.२०१७ रोजीच्या विद्यापीठ परिपत्रकानुसार वाढीव १० % प्रवेश (प्रती विद्यार्थी रु.३००/- प्रमाणे) | दिनांक १८.७.२०१७ रोजीच्या मा.कुलगुरु महोदयांनी दिलेल्या मान्यतेनुसार वाढीव १० % प्रवेश (प्रती विद्यार्थी रु.३००/- प्रमाणे) | शै. वर्ष २०१७-१८ करिता **एकुण प्रवेश क्षमता** |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | ॲड.सिताराम आनंदरामजी बाहेती कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय जळगाव | **प्रथम वर्ष वाणिज्य** | २२० | ४४ | -- | २६४ |

उपरोक्त प्रमाणे मंजुर विद्यार्थी संख्या हि फक्त शै.वर्ष २०१७-१८ करिताच व फक्त वरील वर्गासाठीच विचारात घ्यावी व त्याप्रमाणे आपल्या दप्तरी नोंद करण्यात यावी, हि विनंती.

कळावे.

विद्यार्थी प्रवेश
जा क्र २४७

Adv. S. A. Baheti College ★ Jalgaon ★

आपला विश्वासु,

उपकुलसचिव ( संलग्नता )

प्रत माहितीस्तव तथा पुढील कार्यवाहीसाठी -
१) मा.प्राचार्य, / संचालक, ॲड.सिताराम आनंदरामजी बाहेती कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय ,जळगाव
२) मा.परीक्षा नियंत्रक,उ.म.वि.जळगांव
३) मा.समवयक,विद्यार्थी ई -सुविधा केंद्र, उमवि जळगाव यांना - कृपया वरीलप्रमाणे विद्यार्थी प्रवेश क्षमता वाढीची कार्यवाही करावी, हि विनंती.

Adv. S. A. Baheti College,Jalgaon

PRINCIPAL
Adv. Sitaram (Babanbhau) Anandramji Baheti

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## संलग्नता विभाग

जा.क्र. कबचौउमवि/५/५०२/२०१८ दि.१७.९.२०१८

प्रति,
**मा.उपकुलसचिव,**
प्रवेश व पात्रता विभाग,
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव.

**विषय :-** शै.वर्ष २०१८-२०१९ करिता विद्यार्थी प्रवेश क्षमता वाढवुन देणे बाबत.
**संदर्भ :-** महाविद्यालयाचे पत्र जा.क्रSABC/४१८/२०१८-१९ दि.१२.९.२०१८ चे पत्र.

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषयास अनुसरुन प्राप्त झालेल्या आदेशान्वये आपणास कळविण्यात येते कि, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता विद्यार्थी क्षमता वाढवुन मिळण्याबाबत विद्यापीठास प्रस्ताव सादर केलेला होता. त्याअनुषंगाने शै.वर्ष २०१८-१९ करीता विद्यार्थ्यांच्या प्रवेश क्षमतेत खालील प्रमाणे वाढ करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

**<u>शै.वर्ष २०१८-२०१९ करिता प्रवेश क्षमता वाढी बाबतचे विवरण</u>**

| अ.क | महाविद्यालयाचे नाव | विद्यार्थी संख्या वाढीचा वर्ग / अभ्यासक्रम | मंजुर असलेली मुळ प्रवेश क्षमता | दि. १२.७.२०१८ रोजीच्या विद्यापीठ परिपत्रकानुसार **वाढीव १० % प्रवेश** (प्रती विद्यार्थी रु.३००/- प्रमाणे) | दि. १२.७.२०१८ रोजीच्या विद्यापीठ परिपत्रकानुसार पुन्हा **वाढीव १० % तील प्रवेश** (प्रती विद्यार्थी रु.३००/- प्रमाणे) | शै. वर्ष २०१८-१९ करिता **एकुण प्रवेश क्षमता** |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | क्रीडा रसिक एज्यु.सोसा.संचलित, कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जळगाव | **प्रथम वर्ष कला** | २२० | २२ | ०१ | ~~२४३~~ 243 |

उपरोक्त प्रमाणे मंजुर विद्यार्थी संख्या हि **फक्त शै.वर्ष २०१८-१९ करिताच** व फक्त वरील वर्गासाठीच विचारात घ्यावी व त्याप्रमाणे आपल्या दफ्तरी नोंद करण्यात यावी, हि विनंती.

कळावे.

Baheti College,Jalgaon
No. 139
05/10/18

आपला विश्वासू,

सहा.कुलसचिव
( संलग्नता )

**<u>प्रत माहितीस्तव तथा पुढील कार्यवाहीसाठी -</u>**

१) मा.प्राचार्य, / संचालक, क्रीडा रसिक एज्यु.सोसा.संचलित, कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,जळगाव.
२) मा.संचालक,परीक्षा व मूल्यमापन मंडळ,उ.म.वि.जळगांव
३) मा.समवयक,विद्यार्थी ई -सुविधा केद्र, उमवि जळगाव यांना - कृपया वरीलप्रमाणे विद्यार्थी प्रवेश क्षमता वाढीची कार्यवाही करावी, हि विनंती.

प्रवेश
5/10

Adv. S. A. Baheti College

PRINCIPAL
Adv. Sitaram (Babanbhau) Anandramji Baheti
Arts, Commerce & Science College, Jalgaon

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव - ४२५००१**

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon - 425001**

"A" Grade NAAC Re-accredited (3rd Cycle)

जा.क्र.कबचौ उमवि / ५ / विस्तार मान्यता-२०१९-२० / डी.ओ. 5/294 /२०१९

प्रति,

दिनांक : 25-07-2019

मा.प्राचार्य/मा.संचालक,
क्रिडा रसिक एज्युकेशन सोसायटीचे ॲड.सिताराम (बबनभाऊ) आनंदरामजी बाहेती कला वाणीज्य व विज्ञान महाविद्यालय,जळगाव

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून नविन विद्याशाखा / नविन अभ्यासक्रम/ नविन विषय / प्रवेश क्षमतेत वाढ / अतिरिक्त तुकडी विस्ताराच्या प्रथम संलग्नीकरणाबाबत

संदर्भ :-
१) एनजीसी-२०१७/(२०८/१७)/मशि-४ दिनांक १३.०९.२०१७
२) शासन आदेश क्रमांक मान्यता २०१९/(१३१/१९)/मशि-४ दिनांक १५.०६.२०१९
३) शासन आदेश क्रमांक मान्यता २०१९/(१३४/१९)/मशि-४ दिनांक १५.०६.२०१९
४) शासन आदेश क्रमांक मान्यता २०१९/(१३५/१९)/मशि-४ दिनांक १५.०६.२०१९
५) विद्यापीठाचे पत्र क्र. कबचौ उमवि/५/FTA LIC १९-२०/D.O. 5 / 236 /२०१९, दि. 08-07-2019

महोदय/महोदया,

शासनाने उपरोक्त विषयी संदर्भिय क्र.०२, ०३ व ०४ च्या शासन निर्णयानुसार महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून नविन विद्याशाखा / नविन अभ्यासक्रम / नविन विषय / अतिरिक्त तुकडी/ विद्यार्थी संख्या वाढ विस्तारास मान्यता प्रदान केलेली असून, त्याअनुषंगाने प्राप्त आदेशान्वये आपल्या महाविद्यालयाच्या विस्तारासंदर्भात प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार तपासणी करुन अहवाल सादर करण्यासाठी विद्यापीठाद्वारा संदर्भिय पत्र क्रमांक ०५ अन्वये स्थानिक तपासणी समितीची नियुक्ती करण्यात आली होती. सदर स्थानिक तपासणी समितीने आपल्या महाविद्यालयास भेट देवून विद्यापीठास अहवाल सादर केलेला असून, मा. कुलगुरु महोदयांनी सदरच्या अहवालास मा. विद्या परिषदेच्या वतीने मान्यता प्रदान केलेली आहे.

उपरोक्त अनुषंगाने आपणांस कळविण्यांत येते की, विद्यापीठामार्फत नियुक्त करण्यांत आलेल्या तज्ञ समिती तसेच स्थानिक तपासणी समितीने त्यांच्या अहवालात सूचीत केलेल्या आणि विद्यापीठाचे दिनांक २५.०१.२०१९ रोजीचे पत्र तसेच त्यासोबतच्यातक्त्या मध्ये नमूद केलेल्या अटी व त्रुटींची तसेच ह्या पत्रासोबतच्या तक्त्यातील रकाना क्रमांक ०७ मध्ये नमूद केलेल्या त्रुटींची आणि संदर्भिय क्र. ०२, ०३ व ०४ च्या शासन निर्णयातील अटी व त्रुटींची ०३ महिन्यांच्या आंत परिपूर्ण स्वरुपात पूर्तता करण्याच्या अधीन राहून, आपल्या महाविद्यालयास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम ११० नुसार सोबतच्या तक्त्यात नमूद करण्यात आलेल्या नविन विद्याशाखा / नविन अभ्यासक्रम / नविन विषय / विद्यार्थी संख्या वाढ / अतिरिक्त तुकडीच्या विस्तारास <u>शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासुन प्रथम संलग्नता प्रदान करण्यात येत असून, शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासुन विद्यार्थी प्रवेशास परवानगी देण्यात येत आहे.</u>

आपल्या महाविद्यालयाच्या विस्ताराकरिता प्रदान करण्यांत आलेली मान्यता ही शैक्षणिक वर्ष २०१९-२० या एका वर्षाकरिता राहील व सदर मान्यतेचे माहे ऑगस्ट मध्ये वेळोवेळी नुतनीकरण / नैसर्गिक विस्तार करणे बंधनकारक राहील, याची कृपया नोंद घ्यावी. आपणांस मान्य केलेले विद्यार्थीसंख्ये इतकेच विद्यार्थी आपण शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता प्रवेशीत करावयाचे आहेत, याचीही कृपया नोंद घ्यावी. आपणांस सूचित करणेत येते की, विस्तारासंदर्भात खालील बाबींचीदेखील लवकरात लवकर पूर्तता करावी.

- परिनियम ४१५(१)प्रमाणे शासनाच्या व युजीसीच्या कार्यभारानुसार आवश्यक तेवढ्या नियमीत शिक्षकांची नेमणूक करून त्यांचे प्रस्ताव विद्यापीठाच्या व्याख्याता मान्यता विभागास सादर करून त्यांच्या नियुक्तीस विद्यापीठाची मान्यता घ्यावी.
- आपणाकडून अटी पूर्तता अहवाल प्राप्त झाल्यानंतर व आपणांस घालून दिलेल्या अटी / त्रुटींची परिपूर्ण स्वरुपात पूर्तता झाल्यानंतरच शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता संलग्नीकरणाच्या नुतनीकरणाबाबत / नैसर्गिक विस्ताराबाबत विचार करण्यांत येईल.

करीता या पत्रात नमूद केलेल्या बाबींची तसेच सोबतच्या तक्त्यातील रकान्यामध्ये नमूद केलेल्या अटी/त्रुटींची पूर्तता ०३ महिन्यांच्या आंत करण्यांत येऊन, आवश्यक त्या साक्षांकीत कागदपत्र / दस्तऐवजांसह अटी-पूर्तता अहवाल विद्यापीठात सादर करण्यांत यावा.

कळावे,

Adv. S. A. Baheti College ✱ Jalgaon ✱

Adv. S. A. Baheti College ✱ Jalgaon ✱

आपला विश्वासू,

प्रत माहितीस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव :-

१) मा. अवर सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.
२) मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे.
३) मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगाव विभाग, आकाशवाणी केंद्राच्या शेजारी, महाराष्ट्र राज्य जीवन प्राधिकरण इमारत, पहिला मजला, जळगांव.
४) मा. संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, कबचौ उमवि, जळगांव.
५) मा. उपकुलसचिव, व्याख्याता मान्यता विभाग, कबचौ उमवि, जळगांव.
६) उपकुलसचिव, प्रवेश पात्रता विभाग, कबचौ उमवि, जळगांव.
७) समन्वयक, विद्यार्थी सहायता व सुविधा केंद्र, कबचौ उमवि, जळगांव.

---

विद्यापीठाचे पत्र क्रमांक जा.क्र. कबचौ उमवि/५/विस्तार मान्यता-२०१९-२०/ डी.ओ. 5/ 294 /२०१९ दिनांक : 25-07-2019

Details of Extension Category :

| Sr. No. | Name of College | Type of Extension | | | | Approval of University |
|---|---|---|---|---|---|---|
| | | New Faculty | New Course / Subject | Additional Division | Increase in Intake | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | [E100006] KRIDA RASIK EDUCATION SOCIETY ADV.SITARAM (BABANBHAU) BAHETI ARTS COMMERCE AND SCIENCE COLLEGE JALGAON | ---- | COMMERCE AND MANAGEMENT - B.B.A. [ FIRST YEAR ] - 60 COMMERCE AND MANAGEMENT - B.C.A. [ FIRST YEAR ] - 60 | ---- | | First Time Affiliation is granted to the Extension Category from the Academic Year 2019-20 and student's admission as well subject to the fulfillment of the conditions as mentioned below within 03 months. A) The conditions as laid down by the University,vide its letter dated 25/01/2019 alongwith Table. B) Conditions as mentioned in G.Rs dated 13/09/2017. C) Other conditions as mentioned in this letter. D) Following conditions as mentioned by LIC. 1. Purchase at least 200 books for BBA & BCA respectively 2. The college should have dedicated computer Lab with required softwares for BBA and BCA with intake as per division one of intake 60 for each course |

(ग. वा. पवार)
उपकुलसचिव, संलग्नता विभाग

Adv. S. A. Baheti College Jalgaon

PRINCIPAL
Adv. Sitaram (Babanbhau) Anandramji Baheti
Arts, Commerce & Science College, Jalgaon

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

## Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

**संलग्नता विभाग**

**जा.क्र.कबचौउमवि/5/PGINTAKE[M.A/M.Com/M.S.W.]22-23/255/2022** **दिनांक:29/08/2022**

प्रति,

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत**
**पदव्युत्तर अभ्यासक्रम भाग-1 (एम.ए./एम.कॉम./एम.एस.डब्ल्यू.)**
**राबविणा-या महाविद्यालयांचे मा.प्राचार्य........**

**विषय:- शैक्षणिक वर्ष 2022-23 करिता एम.ए./एम.कॉम./एम.एस.डब्ल्यू. भाग-1 या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाची विद्यापीठाने ठरवून दिलेली विषयनिहाय विद्यार्थी संख्या.....**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये शैक्षणिक वर्ष 2022-23 करिता एम.ए., एम.कॉम. व एम.एस.डब्ल्यू. या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाची विद्यार्थी प्रवेशक्षमता निश्चित करणेसाठी विद्यापीठाच्या संदर्भिय पत्रान्वये पदव्युत्तर अभ्यासक्रम राबविणा-या संलग्नीत महाविद्यालयांकडून विहीत नमुन्यातील तक्त्यामध्ये [तक्ता (अ), (ब), (क) व (ड)] आवश्यक त्या कागदपत्रांसह माहिती विद्यापीठास सादर करणेबाबत सूचित करण्यांत आले होते.

पदव्युत्तर अभ्यासक्रम राबविणा-या संलग्नीत महाविद्यालयांनी विद्यापीठाकडे सादर केलेल्या माहिती व कागदपत्रांच्या अनुषंगाने, शैक्षणिक वर्ष 2022-23 साठी पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाकरिता विद्यार्थी संख्या निश्चित करणेबाबत शिफारशी करणेसाठी, प्राप्त आदेशान्वये, समिती गठीत करण्यांत आली होती. सदर समितीने **एम.ए./एम.कॉम./एम.एस.डब्ल्यू. या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या** प्रथम वर्षाकरिता विद्यार्थी संख्येबाबत विद्यापीठास अहवाल सादर केलेला असून, सदर अहवालास मा.कुलगुरु महोदयांनी मान्यता प्रदान केलेली आहे. तरी यासंदर्भात प्राप्त निर्देशान्वये शैक्षणिक वर्ष 2022-23 करिता संलग्नीत महाविद्यालयांची **एम.ए./एम.कॉम./एम.एस.डब्ल्यू.** या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाची विद्यार्थी संख्या निश्चित करण्यांत आली असून, महाविद्यालयनिहाय विद्यार्थी संख्येबाबतचा तक्ता सदरच्या पत्रासोबत जोडलेला आहे.सदरच्या तक्त्यात रकाना क्र. 4 मध्ये विद्यापीठाने मंजूर केलेली मूळ प्रवेश क्षमता + (अधिक) शैक्षणिक वर्ष 2022-23 करीता मंजूर केलेली वाढीव प्रवेश क्षमता असे नमूद करण्यात आलेले आहे.

सोबतच्या तक्त्यातील महाविद्यालयांना त्या-त्या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी ठरवून देण्यांत आलेली प्रथम वर्षाची विद्यार्थी संख्या ही महाविद्यालयाने सादर केलेल्या माहिती व कागदपत्रांच्या आधारे निश्चित करण्यांत आलेली असून, ठरवून दिलेल्या विद्यार्थी संख्येइतकेच प्रवेश महाविद्यालयांनी गुणवत्ता यादी नुसारच करावयाचे आहेत. विद्यापीठाने मान्यता दिलेल्या प्रवेश क्षमतेपेक्षा जास्तीचे प्रवेश विद्यापीठामार्फत मान्य करण्यात येणार नाहीत व त्यास आपण सर्वस्वी जबाबदार रहाल, याची कृपया नोंद घ्यावी.

Adv. S. A. Baheti College * Jalgaon *

..2..

महाविद्यालयांमध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी मंजूर करण्यात आलेली मूळ प्रवेश संख्या आणि वाढीव प्रवेश संख्या ही महाविद्यालयांमधील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी उपलब्ध असलेला शिक्षक वर्ग हा परीक्षेशी संबंधित असलेल्या सर्व कामकाजांमध्ये सहभागी राहील या अटीच्या अधीन राहून मंजूर करण्यात येत आहे व याची सर्वस्वी जबाबदारी त्या त्या महाविद्यालयांच्या मा. प्राचार्यांची राहील, याची कृपया नोंद घ्यावी. जी महाविद्यालये शैक्षणिक वर्ष 2022-23 मध्ये सदर अटीची पूर्तता करणार नाहीत त्या महाविद्यालयांना शैक्षणिक वर्ष 2023-24 साठी कोणत्याही सबबीवर वाढीव प्रवेश संख्या मान्य करण्यात येणार नाही, याची प्रकर्षाने नोंद घ्यावी.

आपणांस विदीत करणेत येते की, पदव्युत्तर वर्गाच्या प्रथम वर्षात वाढीव विद्यार्थी प्रवेशित झाल्यानंतर प्रवेशित करावयाच्या वाढीव विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयाने **एम.ए., एम.कॉम वर्गासाठी प्रति विद्यार्थी रुपये 300/- (अक्षरी रुपये तीनशे मात्र)** व **एम.एस.डब्ल्यू. वर्गासाठी प्रति विद्यार्थी रुपये 600/-** **(अक्षरी रुपये सहाशे मात्र)** अतिरिक्त संलग्नता शुल्क म्हणून विद्यापीठाच्या संलग्नता विभागामार्फत बँकर्स चेकव्दारे/धनाकर्षाव्दारे जमा करणे आवश्यक राहील. **सदर शुल्क जमा केल्यानंतर सलंग्नता विभागामार्फत समन्वयक, ई-सुविधा, कबचौउमवि, जळगाव यांना शैक्षणिक वर्ष 2022-23 करीता वाढीव विद्यार्थी संख्येबाबतची माहिती कळविण्यात येईल व त्यानंतरच वाढीव प्रवेशाची ऑनलाईन पध्दतीव्दारे नोंद घेण्यात येईल.** तसेच सदर शुल्क जमा केल्याचे चलन महाविद्यालयाने प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी विद्यापीठात जमा करतेवेळी सादर करावयाची आहे. सदरचे शुल्क जमा केल्याशिवाय व सदरची भरणा पावती पात्रता विभागास दाखविल्याशिवाय आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे पात्रता अर्ज स्विकारले जाणार नाहीत. **सदरचे अतिरिक्त संलग्नता शुल्क महाविद्यालयाने अदा करावयाचे असून ही रक्कम विद्यार्थ्यांकडून घेण्यांत येवू नये.** या संदर्भात काही तक्रार प्राप्त झाल्यास त्यास महाविद्यालय प्रशासन जबाबदार राहील, याची नोंद घ्यावी. तसेच, शैक्षणिक गुणवत्ता ढासळणार नाही यासाठी महाविद्यालयास आवश्यक त्या मुलभूत सोयी-सुविधा व तत्सम बाबींची, उदा. वर्गसंख्या, प्रात्यक्षिकांसाठी लागणारे उपकरणे, ग्रंथालयातील पुस्तके इत्यादि गोष्टींची पूर्तता करणे बंधनकारक राहील. सदर बाबींची परिपूर्ण स्वरुपात पूर्तता करुन महाविद्यालयाने विद्यापीठाच्या संलग्नता विभागास अहवाल सादर करावा. महाविद्यालयाने यासंदर्भात पूर्तता न केल्यास किंवा काही तक्रार प्राप्त झाल्यास, त्याचप्रमाणे काही न्यायालयीन बाबी उद्‌भवल्यास, त्याबाबतची संपूर्ण जबाबदारी ही संबंधित महाविद्यालयाच्या प्रशासनाची व पर्यायाने संबंधित महाविद्यालयाच्या मा.प्राचार्यांची राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

आपणांस असेही विदीत करणेत येते की, **एम.ए./एम.कॉम./एम.एस.डब्ल्यू. या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी** विद्यापीठाने मंजूर केलेल्या वाढीव विद्यार्थी संख्येस व्यवस्थापन कोटा राहणार नाही.

सदर परिपत्रकान्वये **एम.ए./एम.कॉम./एम.एस.डब्ल्यू.** या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाकरिता मंजूर करण्यांत आलेले वाढीव प्रवेश हे फक्त शैक्षणिक वर्ष 2022-23 करिताच राहतील, याची कृपया नोंद घ्यावी, ही विनंती.

**एम.ए./एम.कॉम./एम.एस.डब्ल्यू.** या पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाची विद्यार्थी संख्या पुन:श्च वाढवून मिळणेबाबत कोणतेही विनंती अर्ज/प्रस्ताव नव्याने पाठवू नयेत. याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे,

Adv. S. A. Baheti College ✱ Jalgaon ✱

आपला विश्वासू,
Sd/-
**(जी.एन.पवार)**
उपकुलसचिव
(संलग्नता विभाग)

सोबत:- वरीलप्रमाणे

***<u>प्रत माहिती तथा कार्यवाहीस्तव:-</u>***

1) मा. प्र.संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, क.ब.चौ.उ.म.वि., जळगांव.
2) मा.उपकुलसचिव, / सहा.कुलसचिव,परीक्षा विभाग, क.ब.चौ.उ.म.वि., जळगांव.
3) मा.संगणक केंद्रप्रमुख, परीक्षा विभाग, क.ब.चौ.उ.म.वि., जळगांव.
4) सहा.कुलसचिव (अ.का.), प्रवेश पात्रता व अभ्यासमंडळ विभाग, क.ब.चौ.उ.म.वि., जळगांव.
5) समन्वयक, ई-सुविधा, क.ब.चौ.उ.म.वि., जळगांव.

***<u>पात्रता व परीक्षा विभाग यांना-</u>*** आपणास विनंती की, महाविद्यालयाचे पात्रता व परीक्षा अर्ज स्विकारतांना कला व वाणिज्य विद्याशाखेकरीता प्रवेशित केलेल्या अतिरीक्त (वाढीव) विद्यार्थी संख्येसाठी प्रति विद्यार्थी **रु. 300/- (अक्षरी रुपये तीनशे मात्र)** व एम.एस.डब्ल्यू. अभ्यासकमासाठी प्रति विद्यार्थी **रु.600/- (अक्षरी रुपये सहाशे मात्र)** इतकी रक्कम भरली असल्याची कृपया खात्री करावी.

Sd/-
**(जी.एन.पवार)**
उपकुलसचिव
(संलग्नता विभाग)

**<u>प्रतिलिपी:-</u>**

1) मा. कुलगुरु कार्यालय, क.ब.चौ.उ.म.वि., जळगांव.
2) मा.प्र-कुलगुरु कार्यालय, क.ब.चौ.उ.म.वि., जळगांव.
3) मा. कुलसचिव कार्यालय, क.ब.चौ.उ.म.वि., जळगांव.
4) मा.प्र.वित्त व लेखाधिकारी, क.ब.चौ.उ.म.वि., जळगांव.



Adv. S. A. Baheti College ★ Jalgaon ★

| क्र. | महाविद्यालयाचे नाव | पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे विषय | विद्यापीठाने मंजूर केलेली विद्यार्थी प्रवेशक्षमता (मूळ + अतिरीक्त) |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 7 | श्रीमती. जी. जी. खडसे महाविद्यालय, मुक्ताईगर, जि. जळगांव. | M.A.English | 60 |
| | | M.Com. | 60 |
| 8 | म. गांधी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,चोपडा, जि. जळगांव. | M.A. Marathi | 60 |
| | | M.A.English | 45+20 |
| | | M.A.Economics | 45+20 |
| | | M.A. Politics | 45+20 |
| | | M.Com. | 60+30 |
| 9 | चाळीसगांव एज्यूकेशन सोसायटीचे बी.पी.आर्टस, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चाळीसगांव, जि.जळगांव. | M.A. Marathi | 120 |
| | | M.A.English | 60 |
| | | M.A.Economics | 60+12 |
| | | M.A.Political Sci | 60+12 |
| | | M.COM. | 120+24 |
| 10 | यशवंतराव चव्हाण शिक्षण प्रसारक मंडळाचे दादासाहेब दिगंबर शंकर पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय एरंडोल, जि. जळगांव | M.COM. | 40 |
| 11 | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय जामनेर जि.जळगांव | M.A. Marathi | 60+12 |
| | | M.A.English | 40 |
| | | M.A. Economics | 60 |
| | | M.COM. | 60+12 |
| 12 | ईकरा शि.स.एच.जे. थिम महाविद्यालय मेहरूण जळगांव | M.A.Urdu | 30 |
| | | M.A. English | 30 |
| 13 | पाचोरा तालुका को.ऑप.चे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पाचोरा. | M.A.English | 60 |
| | | M.A.History | 60 |
| 14 | क्रीडा रसिक एज्युकेशन सोसायटीचे ॲड.सिताराम (बबाभाऊ) वाहेती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जळगांव. | M.COM. | 60+10 |
| 15 | संत मुक्ताबाई महाविद्यालय, मुक्ताईनगर जि.जळगांव | M.A. Economics | 60+12 |
| | | M.COM | 60+12 |
| 16 | ऐनपूर परीसर शि.प्र.मंडळ संचलीत वल्लभाई पटेल कला वाणिज्य व विज्ञान महा. ऐनपूर, जि.जळगाव. | M.A. Marathi | 20 |
| | | M.A. Economics | 20+10 |



Adv. S. A. Baheti College ★ Jalgaon ★

PRINCIPAL
Adv. Sitaram (Babanbhau) Anandramji Baheti
Arts, Commerce & Science College, Jalgaon